# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:07.01.2026** **वार:बुधवार**

1. राज्यात महापालिका निवडणुकीच्या प्रचाराचा जोर वाढला, प्रशासकीय यंत्रणेच्या तयारीलाही गती
2. राज्यभरात दर्पण दिन उत्साहात साजरा
3. शेकडो नागरिकांची कोट्यवधींची फसवणूक करणाऱ्या आंतरराष्ट्रीय टोळीला पकडण्यात पोलिसांना यश आणि
4. माजी केंद्रीय मंत्री आणि पुण्याचे माजी खासदार सुरेश कलमाडी यांच्या पार्थिवावर पुण्यात अंत्यसंस्कार

**निवडणूक**

राज्यात महापालिका निवडणुकीच्या प्रचाराचा जोर वाढत आहे. विविध पक्षांचे ज्येष्ठ नेते आणि उमेदवार प्रचारसभा घेत आहेत. मोठ्या शहरातील उमेदवार अनेक गृहनिर्माण संस्थांना भेटी देत जास्तीत जास्त मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत आहेत. उमेदवार बिनविरोध निवडून आल्याच्या मुद्यावरून राजकीय पक्षांमध्ये आरोप प्रत्यारोप सुरूच आहेत.

भाजपा नेते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल धुळे, जळगाव आणि नागपूरमध्ये प्रचार सभा घेतल्या.

'धुळे महापालिकेवर पुन्हा भाजपची सत्ता आल्यास धुळ्याला आम्ही उद्योगाचे महानगर बनवू', असं प्रतिपादन फडणवीस यांनी केलं. जळगावमध्ये फडणवीस यांनी भव्य रोड शो केला.

शिवसेना नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नवी मुंबईत ऐरोली इथं रोड शो केला. तर राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रमुख आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल पिंपरी चिंचवडमध्ये प्रचार सभा घेतली.

मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी काँग्रेसनं काल 'मिशन मुंबई' हा जाहीरनामा प्रसिद्ध केला. 'मिशन मुंबई' ही केवळ निवडणुकीची घोषणा नसून मुंबईकरांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित प्रश्नांना केंद्रस्थानी ठेवून शहराचा सर्वांगीण विकास घडवण्याचा निर्धार आहे, असं प्रतिपादन मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष वर्षा गायकवाड यांनी केलं.

नागपूर महापालिकेसाठीचा काँग्रेसचा जाहीरनामा देखील काल प्रकाशित झाला. नागरिकांना दर्जेदार आणि प्रभावी मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी काँग्रेसनं 20 सूत्रांचा जनहितकारी आराखडा सादर केला. 'राज्यातील 288 नगरपालिका निवडणुकांमध्ये काँग्रेस पक्षाला चांगला कौल मिळाला असून नगरपालिका निवडणुकीतील हा झंझावात महानगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये दिसेल', असा विश्वास महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी यावेळी व्यक्त केला.

भारतीय जनता पक्षानं काल ठाणे महानगरपालिका निवडणुकीसाठी आपला जाहीरनामा प्रकाशित केला. ठाण्यात झालेली रस्ते विकासकामं, मेट्रो प्रकल्प, कोपरी पूल यांसारख्या दर्जेदार कामांमुळे आगामी निवडणुकीत ठाण्यात भाजपा जिंकेल असा विश्वास नेत्यांनी व्यक्त केला. भाजप नेते संजय केळकर यांनी ठाण्याचा विकास अधिक वेगानं करण्यासाठी पक्षाकडे बृहद विकास आराखडा तयार असल्याचं सांगितलं.

दरम्यान, 'राज्यातल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका 7-8 वर्षांनंतर होत असूनही मोठ्या प्रमाणावर बिनविरोध उमेदवार निवडून येणं म्हणजे मतदारांचा अधिकार हिरावून घेणं आहे', अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्याध्यक्ष सुप्रिया सुळे यांनी केली आहे.

दरम्यान, नाशिकचे माजी महापौर दशरथ पाटील, आणि अशोक मुर्तडक यांनी काल एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश केला.

**प्रशासकीय तयारी-अहिल्यानगर-जळगाव**

महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वत्र प्रशासकीय तयारीलाही वेग आला आहे.

'महानगरपालिका निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी स्वीप समितीचे विविध उपक्रम निश्चितच सहाय्यभूत ठरतील', असं प्रतिपादन राज्य निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक निरीक्षक आदित्य जीवने यांनी अहिल्यानगर इथं केलं. महिला आणि नवमतदारांचा मतदानातील सहभाग वाढविण्यासाठी विशेष उपक्रम आयोजित करावेत, अशी सूचनाही जीवने यांनी केली.

जळगावमध्ये निवडणुकीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणाचा पहिला टप्पा पार पडला. 2 हजार 7 शे 86 कर्मचाऱ्यांसाठी हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आलं होतं.
पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्येही निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय स्तरावरील द्वितीय टप्प्यातील प्रशिक्षण पार पडलं.

**दर्पण दिन**

राज्यभरात काल दर्पण दिनानिमित्त विविध उपक्रम घेण्यात आले. या निमित्ताने पत्रकारिता महाविद्यालयांसह विविध संस्था संघटनांनी विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून बाळशास्त्री जांभेकरांना अभिवादन केलं; तसंच विविध जिल्ह्यांमध्ये उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कारांचं वितरण मान्यवरांच्या हस्ते झालं.
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकरांना अभिवादन केलं आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार, ज्येष्ठ नेते शरद पवार यांनीही सर्व पत्रकारांना दर्पण दिनाच्या शुभेच्छा दिल्या.
मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचे या वर्षीचे उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार काल जाहीर झाले. 'कृ. पां. सामक' हा प्रतिष्ठेचा जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार प्रकाश अकोलकर यांना जाहीर करण्यात आला आहे. अशोक अडसूळ, ओमकार वाबळे, बाळासाहेब पाटील यांनाही उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार जाहीर झाले आहेत.

**सुधारणांचे वर्ष**

2025 हे वर्ष देशाच्या वाटचालीतलं एक निर्णायक वळण ठरलं. या वर्षात देशात विविध क्षेत्रामध्ये झालेल्या ऐतिहासिक परिवर्तनाबाबत ऐकुया माझ्या सहकारी लौकिका रास्ते यांच्याकडून.....

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारनं गेल्या वर्षात अनेक महत्त्वपूर्ण आणि दूरगामी निर्णय घेतले. दशकानुदशकं अस्तित्वात असलेले जुने कामगार कायदे रद्द करून त्यांच्या जागी चार आधुनिक कामगार संहिता लागू करण्यात आल्या. कर प्रणालीतही मोठी सुधारणा करत जीएसटी अधिक सुटसुटीत करण्यात आला. आता 5 आणि 18 टक्के असे दोनच करदर ठेवण्यात आले असून, 12 लाख रुपयांपर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्यांना प्राप्तीकरातून पूर्ण सवलत देण्यात आली आहे. याचा थेट लाभ मध्यमवर्गीय कुटुंबं आणि एमएसएमई क्षेत्राला झाला असून, सणासुदीच्या काळात त्याचे सकारात्मक परिणाम दिसून आले. व्यवसाय सुलभतेसाठी घेतलेल्या निर्णयांमुळे उद्योग क्षेत्राला नवी ऊर्जा मिळाली. शिक्षण क्षेत्रातही ऐतिहासिक पाऊल उचलत यूजीसी, एआयसीटीई आणि एनसीटीई यांच्या जागी 'विकसित भारत शिक्षण अधिष्ठान' ही एकात्मिक नियामक संस्था स्थापन करण्याचा निर्णय झाला. अणुऊर्जा क्षेत्रात खासगी गुंतवणुकीला परवानगी देणारं शांती विधेयक, ग्रामीण रोजगाराला नवी दिशा देणारं विकसित भारत-जी राम जी विधेयक, अशा सर्वच निर्णयांमुळे 2025 हे वर्ष सुधारणा, आत्मविश्वास आणि विकसित भारताच्या पायाभरणीचं वर्ष ठरवलं आहे.**

**सीबीएसई**

केंद्रीय माध्यमिक शिक्षणमंडळ म्हणजे सीबीएसईनं परीक्षांशी संबंधित ताणतणावासंदर्भात विद्यार्थ्यांना मदत व्हावी, या दृष्टीनं कालपासून ऑनलाइन समुपदेशन सेवा कक्ष सुरू केला आहे. दहावी आणि बारावीची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी या सेवेचा पहिला टप्पा येत्या एक जूनपर्यंत सुरू राहणार आहे. परीक्षांदरम्यान विद्यार्थ्यांचा ताण तणाव कमी होऊन त्यांची मानसिक स्थिती चांगली रहावी, आणि त्यांना आत्मविश्वासानं परिक्षा देता यावी, या उद्देशानं मंडळानं ही सेवा सुरु केली आहे. विद्यार्थी 1800 1180 04 या क्रमांकावर दिवसा किंवा रात्री कधीही या सेवेचा लाभ घेऊ शकतील.

**ऑनलाइन फसवणूक**

ऑनलाइन परदेशी चलन आणि सोन्याच्या व्यवहारात 200 कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेची फसवणूक करणाऱ्या एका टोळीला पकडण्यात पोलिसांना यश आलं आहे. या प्रकरणात आत्तापर्यंत 7 आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याविरुध्द भारतीय न्याय संहिता आणि माहिती तंत्रज्ञान कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मीरा भाईंदर-वसई विरार विभागाचे पोलीस आयुक्त निकेत कौशिक यांनी काल पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

आरोपींनी ऑनलाइन विवाहसंस्था आणि समाज माध्यमाद्वारे गुंतवणूक योजनांचं आमिष दाखवून आधी विश्वास संपादन केला आणि नंतर परदेशी बँक खात्यांवर पैसे हस्तांतरित करण्यात आले, असं पोलिसांनी सांगितलं. नागरिकांनी ऑनलाइन गुंतवणूक करताना सावधगिरी बाळगण्याचा सल्ला पोलिसांनी दिला आहे.

**<u>कासव</u>**

रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन तालुक्यामधील बागमांडला समुद्रकिनारी पहिल्यांदाच नर ग्रीन सी टर्टल जातीचं कासव आढळलं आहे. सुमारे 200 किलो वजनाचे हे दुर्मिळ कासव ओहोटीमुळे किनाऱ्यावर वाहून आलं होतं. वनविभाग, कासव तज्ञ, कासव मित्र आणि स्थानिकांच्या मदतीने तपासणी करून कासवाला नैसर्गिक अधिवासात सुरक्षितपणे सोडण्यात आलं.

**<u>कलमाडी निधन</u>**

माजी केंद्रीय मंत्री आणि पुण्याचे माजी खासदार सुरेश कलमाडी यांच्या पार्थिव देहावर काल दुपारी पुण्याच्या वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. कलमाडी यांचं काल पहाटे पुण्यात निधन झालं. ते 82 वर्षांचे होते. गेल्या काही दिवसांपासून ते आजारी होते.

'कलमाडी हाऊस' या त्यांच्या निवासस्थानी त्यांचं पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आलं होतं. उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील यांनी कलमाडी यांचं अंत्यदर्शन घेतलं. त्यानंतर राज्यसभेच्या माजी खासदार वंदना चव्हाण, माजी आमदार हर्षवर्धन पाटील, उल्हास पवार, रमेश बागवे, विश्वजीत कदम, तसंच ज्येष्ठ दिग्दर्शक जब्बार पटेल यांच्यासह काँग्रेस पक्षाचे आजी-माजी नगरसेवक, पदाधिकारी कार्यकर्ते यावेळी मोठ्या संख्येनं उपस्थित होते. पुणे शहराच्या सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्राला नवी दिशा देण्यात कलमाडी यांचा मोलाचा वाटा होता. पुणे फेस्टिव्हल आणि पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉनसारख्या उपक्रमांची सुरुवात करून त्यांनी पुण्याला राष्ट्रीय स्तरावर वेगळी ओळख मिळवून दिली.

**<u>खेलो इंडिया बीच</u>**

दीव मध्ये दुसऱ्या पर्वातील खेलो इंडिया बीच स्पर्धा सुरू आहेत. स्पर्धेतील दुसरा दिवस महाराष्ट्रासाठी संमिश्र यशापयशाचा ठरला. बीच पेंचक सिलटमध्ये मुंबईच्या क्रीनाशी येवलेने सलग दुसऱ्या वर्षी कास्य पदकाची कमाई केली. महिलांच्या बीच कबड्डीत हरियाणाकडून 47-26 गुणांनी महाराष्ट्र पराभूत झाला. बीच सॉकरमधील साखळीतील सलग दोन पराभवामुळे महिला संघ स्पर्धेतून बाहेर पडला आहे.

**<u>हवामान</u>**

येत्या 24 तासात संपूर्ण राज्यात हवामान कोरडं राहण्याचा हवामान विभागाचा अंदाज असून विदर्भात तुरळक ठिकाणी थंडीची लाट येण्याची शक्यता आहे. गोंदिया जिल्ह्यात सर्वात काल कमी म्हणजे 7 अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद झाली.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**